# पोलीस अधीक्षक, कार्यालय गडचिरोली

## जनसंपर्क शाखा

P.R.O Office, Gadchiroli
**Phone No. 07132223142 Address: SP Office,Gadchiroli**
**E-mail : Prospoffice.gadchiroli@gmail.com**

---

# वार्तापत्र

पोलीस अधीक्षक कार्यालय गडचिरोली
दिनांक ३०/०८/२०१९

दिनांक ०१ मे २०१९ रोजी उपविभाग कुरखेडा अंतर्गत येणाऱ्या मौजा जांभुळखेडा गावाजवळ झालेल्या भुसुरुंग स्फोटात गडचिरोली पोलीस दलाचे १५ जवान शहीद झाले. यानंतर गडचिरोली पोलीस दलाकडुन या भुसुरुंग स्फोटात सहभागी असलेल्या मौजा लवारी येथील इसमांना अटक करण्यात आली होती.

त्या अनुषंगाने मौजा लवारी येथील नागरिकांनी ग्रामसभा घेऊन, ग्रामसभा लवारी यांचेकडुन गावातील ४९ ग्रामस्थांच्या सहयासह गावातील अटक इसम हे दोषी आहेत परंतू त्यांना एक वेळ माफी देण्यात यावी. अशा आशयाचे निवेदन मा.पोलीस अधीक्षक, कार्यालय गडचिरोली श्री. शैलेश बलकवडे सा. यांना दिले आहे.

यावेळी उपस्थित ग्रामस्थांनी सांगितले की, नक्षलवादयांनी गावातील तरुणांना फितवुन त्यांना आपल्या बरोबर घेतले, आणि दि. ०१ मे २०१९ रोजीची घटना घडविली. नक्षलवाद्यांमुळे आदिवासी समाजातील मौजा लवारी येथील तरुण पिढी बर्बाद होत असल्याचे तसेच नक्षलवादी हे आपल्या स्वतःच्या फायदयासाठी आमच्या मुलाचा वापर केल्याचे ग्रामस्थांचे म्हणणे आहे.

यातुन मार्ग काढण्यासाठी लवारी गावाने स्वयंस्फुर्तीने पुढे येवुन ग्रामसभा घेवुन नक्षलवादयांना आमच्या गावात आम्ही परत पाय ठेवु देणार नाही. तसेच ‘नक्षल गावबंदीचा’ ठराव लवकरच ग्रामसभा घेणार असल्याचे म्हटले. त्याचबरोबर ग्रामसभेने आमच्या गावच्या विकासासाठी गावात पोलीस दलाने जनजागरण मेळाव्याचे आयोजन करावे असे पत्र पुराडा पोलीस स्टेशन यांना दिले असल्याबाबत त्यांनी मा. पोलीस अधीक्षक श्री. शैलेश बलकवडे साो यांना सांगितले.

नक्षलवादी हे आदिवासी नागरिकांना जल, जंगल व जमीनीसाठी व त्यांच्या हक्कासाठी आपण लढत असल्याचे सांगतात. परंतु हा त्यांचा खोटारडेपणा मौजा लवारी येथील ग्रामस्थांनी जगासमोर आणला आहे. नक्षलवादयांना आदिवासी समाजाच्या विकासाबद्दल काही एक देणेघेणे नाही. आदिवासी समाजाच्या हितासाठी लढत असल्याचे एकीकडे भासवुन दुसरीकडे आदिवासी तरुणांना वाममार्गाला लावुन त्यांचा वापर आपल्या फायदयासाठी नक्षलवादी करवुन घेत असल्याचे दिसुन येते. यातुन नक्षलवादी आदिवासींचा फायदा नाही तर नुकसान करीत आहेत.

यावेळी उपस्थित ग्रामस्थांना मा. पोलीस अधीक्षक श्री. शैलेश बलकवडे सा़े. यांनी लवारी गावाच्या विकासासाठी गडचिरोली पोलीस दल आपल्या पाठीशी निश्चितपणे उभे राहील असे आश्वासन दिले. त्याचबरोबर नक्षलवादयांच्या भुलथापांना बळी पडुन नये आपले सुंदर जीवन बर्बाद करु नका व आपल्या गावाच्या विकासासाठी तसेच तरुणांच्या उज्वल भविष्यासाठी नक्षलवादयांना गावात पाय ठेवु न देता ग्रामसभांनी नक्षल गावबंदी मोहिम हाती घेवुन विकासाच्या प्रवाहात सामील व्हावे. यासाठी गडचिरोली पोलीस दल आपणास सर्वतोपरी सहाय्य करेल असे आवाहन मा. पोलीस अधीक्षक श्री. शैलेश बलकवडे सा़े यांनी जिल्ह्याभरातील ग्रामसभांना केले आहे.





कार्यालय
ग्रामसभा लवारी
पत्ता : मु.लवारी पो.पुराडा ता.कुरखेडा जि.गडचिरोली – ४४१२०९
जा.क्र. दिनांक २५/०८/२०१९

अर्ज

प्रति
माननिय पोलीस अधिकारी साहेब कार्यालय गडचिरोली
यांचे सेवेशी अर्ज सादर

विषय : अटक झालेले आरोपींना सुटका मिळण्या बाबत
अर्जदार : सर्वश्री गावकरी मौजा लवारी पो. पुराडा पोलीस स्टेशन पुराडा ता. कुरखेडा जिल्हा गडचिरोली
महोदय : सर सविनय विनंती याप्रमाणे आहे की, लवारी येथील ममर्च ६ (सहा) व्यक्तिना अटक केलेली आहेत त्या व्यक्तिंचा जे काही गलत्या झालेले असतील तरी पण सर एकदा माफ करून सोडण्यात यावी असा आमच्या सर्व गावकऱ्यांची नम्र विनंती आहे.

आरोपींचा नाव - ① परसराम मनिराम तुलावी मु. लवारी
② दिलीप श्रीराम हिडामी —"—
③ सोमसाय दलसाय मडावी —"—
④ किसन सिलाराम हिडामी —"—
⑤ सकरु रामसाय नाट —"—
⑥ प्रकाश किसन हिडामी —"—

तरी वरील दिलेली अर्ज मंजूर करावी
हि विनंती.

सरपंच/सचिव
ग्रामसभा लवारी
ता.कुरखेडा जि.गडचिरोली

सर्वश्री गावकरी मंडळी
① गणेश तुलावी



② बाबुराव हिडामी
③ पांडूरंग रामसाय गावडे
④ सोमजी सुकलु हलामी सोमजी
⑤ शायसिंग सिलाराम हिडामी
6) लालाराम मन्साराम कुमोटी
7) करंगसु हरसिंग कुमोटी
8) अंताराम बिरसींग कुमोटी
9) कलीराम रनु हिडामी
10) सरेशा शेरकु तुलावी
11) नरेशा मनिराम तुलावी
12) जगदेव मनकर हिडामी
13) कुंधराम पांडूरंग गावडे
14) रामलाल हरसिंग कुमोटी
15) कोलसाय दिन्नु मडावी
16) पुरुषोत्तम कल्लो
17) झाडूराम भंकालु कुमरे
18) गिरीशा मन्साराम कुमा
19) सदाराम रामसाय गावडे
20) शामलाल धनसिंग मडावी
21) कुमारोबाई बाबुराव हिडामी
22) सतवंती सदाराम गावडे
23) विमल सोमसाय मडावी
24) ललीता आसाराम हिडामी
25) जास्वंदा मंगरु हिडामी
26) उर्मीला नागसाय हिडामी
27) रुकमला पुलसिंग धुर्वे
28) सोनकाय स्वरूसिंग हिडामी
29) प्रतिभा रामजी हलामी
30) समसो रामलाल गावडे
31) जानकाय धर्मु मडावी
32) जमुना सामसाय मडावी
33) रमला मैनु कुमरे
34) सुंदरा राजाराम हिडामी
35) रासो किसन हिडामी
36) मनुषा कुमोटी
37) दलवी गावडे
38) संती हिडामी
39) रमली हिडामी
40) प्रेमिला हिडामी
41) प्रेमिला मडावी
42) सुरजो हिडामी
43) निर्मला तुलावी
44) दसवंती हलामी
45) वसंता गावडे
46) वदाना हिडामी
47) कमला तुलावी
48) शेवंता तुलावी
49) सुनिता हिडामी